प्राथमिक आरोग्य सेवांचे जाळे निर्माण करणार- मुख्यमंत्री

पुणे– प्राथमिक आरोग्यावर भर दिल्यास विशेषोपचार असलेल्या संदर्भ सेवांवरील ताण कमी होतो. त्यामुळे संपूर्ण राज्यात प्राथमिक आरोग्य सेवांचे जाळे निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. त्यादृष्टीने राज्यातील आरोग्य सेवेची पुनर्रचना करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

मावळ तालुक्यातील आंबी– तरंगवाडी येथे पुष्पलता डी. वाय. पाटील रुग्णालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार सुनील शेळके, डी. वाय. पाटील विद्यापीठ, नवी मुंबईचे अध्यक्ष तथा कुलपती डॉ. विजय पाटील, डी. वाय. पाटील विद्यापीठ कोल्हापूरचे कुलपती संजय पाटील, डी. वाय. पाटील विद्यापीठ, नवी मुंबईच्या उपाध्यक्ष तथा उपकुलपती डॉ. शिवानी पाटील, माजी राज्यमंत्री संजय उर्फ बाळा भेगडे, उद्योजक रामदास काकडे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, राज्य शासनाच्या विविध योजना नीटपणे राबविण्याचे काम विद्यापीठाच्या माध्यमातून करण्यात येते. महात्मा फुले जनआरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेच्या माध्यमातून ५ लाख रुपयांपर्यंत उपचार मोफत करण्यात येतात. आरोग्यसेवेच्या क्षेत्रात विमा आणि सेवेची खात्री या माध्यमातून गरीब रुग्णांवर उपचार करण्यात येत आहेत. राज्यात प्राथमिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करण्यासह द्वितीयस्तरीय आरोग्य सेवाही बळकट करण्यात येणार आहेत. विशेषोपचारासाठी शासकीय रुग्णालये, विद्यापीठांची आणि खाजगी रुग्णालये आहेत. आरोग्याच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याचा प्रयत्न आहे. गेल्या काही वर्षात १० वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यात आले असून प्रत्येक जिल्ह्यात असे महाविद्यालय उभारण्यात येणार आहे. मुलींना वैद्यकीय शिक्षणाच्या शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णयही शासनाने घेतला. यातून शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विस्तार आणि गुणवत्ता दिसून येत आहे. विद्यापीठाने असेच कार्य सुरू करून नवनवीन ठिकाणी रुग्णालय आणि शैक्षणिक संकुल उभे करावे. त्यामागे समाजसेवेची भूमिका असल्याने शासनातर्फे सर्व सहकार्य करण्यात येईल.

महाराष्ट्रात शिक्षणाच्या क्षेत्रात मोठी क्रांती आणण्याचे आणि तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात संधी मिळवून देण्याचे काम करणाऱ्यांमध्ये डॉ. डी. वाय. पाटील हे एक अग्रणी नाव असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात उच्च शिक्षणाच्या खासगीकरणामुळे डॉ.डी.वाय.पाटील आणि त्यांच्यासारख्या व्यक्तींनी संस्था उभ्या केल्या आणि उच्च शिक्षणाचा विस्तार झाला. त्यामुळे अनेकांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. राज्यात सात खासगी विद्यापीठे या कुटुंबाने सुरू केली आणि गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम सुरू केले. गुणवत्तेला धक्का न लावता उत्तम शिक्षण देण्यासाठी डी.वाय.पाटील यांच्या कुटुंबाने चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. या वाटचालीत पुष्पलता पाटील यांचे संस्कार महत्वाचे ठरले असल्याने त्यांचे नाव रुग्णालयाला देण्यात आले आहे.

पुष्पलता डी. वाय. पाटील रुग्णालयात अत्यंत आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या परिसराला वरदान ठरेल असे रुग्णालय उभे करण्यात आले आहे. औद्योगिक वसाहत आणि परिसरातील सामान्य माणसाला कमी खर्चात चांगले उपचार देण्यासाठी या रुग्णालयाचा फायदा होणार आहे. डॉ.विजय पाटील यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ७० खाटा आरक्षित ठेवल्या आहेत. आतापर्यंत मुख्यमंत्री सहाय्यता निधीने संदर्भित केलेले १२ ते १५ हजार रुग्णांवर उपचार इथे करण्यात आले आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

बेकायदेशीर रजिस्ट्री, जिल्हाधिकारी कर्डिलेंचा दणका

जिल्हा अंतर्गत कोणत्याही तालुका रजिस्ट्री कार्यालयात कोणत्याही तालुक्याची खरेदी-विक्री रजिस्ट्री करण्याची मुभा

नांदेडमध्ये दुय्यम निबंधक तात्काळ निलंबीत

नांदेड– राज्यातील प्रत्येक तालुक्यात आणि जिल्ह्यात जागेची खरेदी-विक्री करण्यासाठी निबंधक कार्यालयात नागरिकांची मोठी गर्दी असते. जागेची खरेदी विक्री हा मोठा आणि तितकाच गंभीर विषय असल्याने या विभागावर पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व वरिष्ठ अधिकाऱ्यांची देखील करडी नजर असते. मात्र, तरीही या विभागात सातत्याने गैरप्रकार होत असल्याचं अनेकदा पाहायला मिळते. येथील कार्यालयात एजंटगिरी फोफोवल्याचं दिसून येतं, तर या एजंटगिरीला निबंधक महोदयांचेच पाठबळ असल्याचही समोर आलं आहे.

नांदेड जिल्ह्याच्या हदगाव येथील निबंधकांनी गैरमार्गाचा वापर करुन तब्बल १९० पेक्षा जास्त कागदपत्रांची नोंदणी चुकीच्या व गैरप्रकाराने केल्याचं समोर आलं. त्यानंतर, नांदेडच्या जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दणका देत निबंधकांचे तत्काळ निलंबन केले आहे. आपल्या प्रामाणिक अन् तत्पर कामकाजाबद्दल कर्डिले यांचा प्रशासनात वेगळाच दबदबा आहे.

राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हा अंतर्गत कोणत्याही तालुका रजिस्ट्री कार्यालयात कोणत्याही तालुक्याची खरेदी-विक्री रजिस्ट्री करण्याची मुभा दिली आहे. शासनाच्या याच योजनेचा गैरफायदा घेऊन नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यात महिन्याभरात तब्बल १२०० रजिस्ट्री नोंदणी करण्यात आल्या. यातील ९०% रजिस्ट्री हदगाव तालुक्याच्या बाहेरील आहेत. या रजिस्ट्री करताना कोणत्याही नियमाचे पालन केले जात नसल्याचे तपासात उघड झाले. याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी आणि जिल्हा निबंधक यांच्या अहवालावरून हदगाव दुय्यम निबंधक सेवलीकर यांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. हदगाव दुय्यम निबंधक संदर्भात सातत्याने तक्रारी करण्यात येत होत्या. त्यानंतर, मी सहनिबंधक यांच्या नेतृत्वात एका पथकाने ४०० पेक्षा जास्त कागदपत्रांची तपासणी केली. त्यामध्ये, १९० पेक्षा जास्त कागदपत्रांमध्ये गैरप्रकार, व्यवहार झाल्याचं समोर आल्याने तेथील निबंधकांवर कारवाई करण्यात आली आहे. निबंधक सेवलीकर यांनी अनेक रजिस्ट्री गैरप्रकार करून केल्याचे तपासात उघड झाल्यानंतर त्यांच्यावर तत्काळ कारवाई करण्यात आल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले.

राहुल कर्डिले अहिल्यानगर जिल्ह्यातले सुपूत्र

- राहुल कर्डिले हे कर्तव्यदक्ष व सर्वसामान्यांसाठी तळमळीने काम करणारे अधिकारी असून गैरप्रकार खपवून घेत नसल्याने त्यांची प्रशासनात वेगळी ओळख आहे. विशेष म्हणजे यापूर्वी केवळ महिनाभरात तीन वेळा त्यांची बदली झाली होती. राहुल कर्डिले हे मूळचे अहिल्यानगर जिल्ह्यातील ठाणगावचे. त्याच ठिकाणी त्यांचे प्राथमिक शिक्षण झालं. तर पार्थडीमधील करंजी या गावात त्यांचे माध्यमिक शिक्षण झालं. अहिल्यानगरच्या विखे महाविद्यालयात त्यांनी इंजिनिअरिंगची पदवी घेतली. त्यानंतर त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. राहुल कर्डिले यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगातून उपनिबंधक म्हणून निवड झाली. त्या दरम्यान त्यांनी यूपीएससीच्या तीन मुलाखती दिल्या होत्या. पण त्यामध्ये अपयश आलं. मात्र, चौथ्या प्रयत्नात ते देशात ४२२ वा क्रमांक मिळवून उत्तीर्ण झाले आणि महाराष्ट्रामध्ये त्यांना काम करण्याची संधी मिळाली. राहुल कर्डिले यांच्या पत्नी प्रियंका कर्डिले यादेखील उपजिल्हाधिकारी म्हणून सेवा बजावत आहेत.

वाद विसरले एकत्र आले! खैरे-दानवेंनी धरला ठेका

छत्रपती संभाजीनगर– मागील काही दिवसांपासून ठाकरे गटातील अंतर्गत वादामुळे चर्चेत आलेले माजी खासदार चंद्रकांत खैरे आणि अंबादास दानवे आज मात्र वेगळ्याच मूडमध्ये पाहायला मिळाले. अंबादास दानवेंवर उघडपणे टीका करणारे चंद्रकांत खैरे यांनी आज रविवारी मात्र दानवेंचा हात पकडत ठेका धरला होता. संभाजीनगर शाखेच्या वर्धापन दिना निमित्त हे दोघे एकत्र आले आहे. या दोघांना एकत्र पाहून शिवसेना ठाकरे गटातल्या शिवसैनिकांनाही हायसे वाटले होते.

८ जून १९८५ रोजी मराठवाड्यात सर्वात पहिली शिवसेनेची शाखा स्थापन करण्यात आली होती. ही शिवसेनेची शाखा संभाजीनगरमध्ये उघडण्यात आली. त्यामुळे आज शाखेचा वर्धापन दिन होताय या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रम ही आयोजित करण्यात आले होते. त्यात विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि माजी खासदार चंद्रकांत खैरे सहभागी झाले होते.

शिवसेनेचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या गुलमंडीत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याचवेळी संगीतमय सांस्कृतिक कार्यक्रमाचे देखील आयोजन केले गेले होते. दरम्यान बिळाची नागीण निघाली गाणं लागताच खैरे आणि दानवेंनी ठेका धरला. खैरे आणि दानवेंचा हाटके अंदाज पाहताच कार्यकर्त्यांनी देखील मनसोक्त डान्स केला.

मातोश्रीपर्यंत जाऊनही न मिटलेला दानवे-खैरेंचा वाद सर्वानाच माहीत आहे. पण अचानक झालेलं हे मनोमिलन सर्वांना धक्का देणारा ठरला आहे. याची चर्चा आता राजकीय वर्तूळातही रंगली आहे. हे मनोमिनल गाण्यावर ठेका धरण्यापूरता होतं की संभाजीनगरच्या राजकारणात हे मनोमिलन दिर्घकाळ चालेल याची ही चर्चा रंगली होती. पण हा क्षण शिवसैनिकांना मात्र दिलासा देणारा ठरला असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

तुळजाभवानी मंदिरातील दर्शन रांगेत भक्तांमध्ये फ्री स्टाईल हाणामारी

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– तुळजाभवानी मंदिरातील दर्शन रांगेत भक्तांमध्ये फ्री स्टाईल हाणामारी,कारण काय?उन्हाळ्याच्या सुट्या आणि त्यात रविवार असल्यामुळे तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती.

तुळजाभवानी मंदिरामध्ये रविवारी दर्शनासाठी आलेल्या भक्तांच्या रांगेत मोठा गोंधळ उडाला. एका लहान मुलाने उलटी केल्याच्या किरकोळ कारणावरून महिला व पुरुष भक्तांमध्ये तीव्र वाद झाला. पाहता पाहता फ्री स्टाईल हाणामारीस सुरुवात झाली. उपस्थितांनी दिलेल्या माहितीनुसार, हा वाद जवळपास १५ ते २० मिनिटांपर्यंत सुरू होता. दर्शन रांगेतील भक्तांमध्ये घालमेल निर्माण झाली. अनेक भाविकांनी संताप व्यक्त करत मोबाइलमध्ये या घटनेचे व्हिडिओ रेकॉर्ड केले. घटनेनंतर सुमारे वीस मिनिटांनी मंदिर व्यवस्थापनाच्या वतीने सुरक्षा गार्ड घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी समजूत काढून परिस्थिती नियंत्रणात आणली.

उन्हाळ्याच्या सुट्या आणि त्यात रविवार असल्यामुळे तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. मात्र, प्रशासनाकडून रांगेचे नियोजन योग्यरीत्या न झाल्याचा आरोप भाविकांकडून करण्यात आला आहे. दर्शन रांगेतील अनेक ठिकाणचे फॅन बंद असल्याने गर्दीमध्ये उकाडा वाढला. त्यामुळे भाविकांमध्ये चिडचिड निर्माण झाली. उष्णता आणि गर्दी यामुळे काही भक्त अस्वस्थ झाल्याचेही निदर्शनास आले. त्यातूनच त्या लहान मुलाला उलटी झाल्याचं बोललं जात आहे.

भाविकांचे म्हणणे आहे की, मंदिर प्रशासनाकडून रांगेच्या नियोजनात गंभीर त्रुटी आहेत. गर्दीचा अंदाज असूनही पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली नाही.संपूर्ण घटनेची चौकशी करून रांगेतील नियोजन अधिक चांगल्या प्रकारे करावे, अशी मागणी स्थानिक भाविक व भक्तपरिवारांकडून होत आहे. योग्य नियोजन केल्यास भक्तांना त्याचा त्रास होणार नाही. शिवाय भक्तांनी संयम राखावा असं आवाहन करण्यात आलं आहे.

पान १ वरुन

विठुरायाचे २७ जूनपासून २४ तास दर्शन

दि. १० जुलै असा आहे. शासकीय महापूजा २.२० वाजता मुख्यमंत्री व मानाचे वारकरी यांचे हस्ते सपत्नीक श्रींची शासकीय महापूजा केली जाणार आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिर जतन व संवर्धन आराखड्यांच्या कामाचा आढावा घेण्यात आला. या यात्रेच्या पार्श्वभूमीवर मंदिर जतन व संवर्धनाची सध्या सुरू असलेली सर्व कामे अंतिम टप्प्यात आहेत. टोकन दर्शन प्रणालीची दि. १५ जून रोजी पहिली चाचणी घेण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली

गोवंशाची होणार नोंदणी

'सुरभी चयन श्रृंखला' या योजनेअंतर्गत अत्युत्कृष्ट अनुवंशिकता असलेल्या गाई- म्हशींची माहिती संकलित करून त्याचा उपयोग भविष्यातील दूध उत्पादन वाढीसाठी करण्यासाठी केंद्र शासनाने सुरभी चयन श्रृंखला योजना कार्यान्वित केली आहे. भारत १९९८ पासून जगात सर्वाधिक दूध उत्पादन करणारा देश असून देशात २०२२-२३ मध्ये २३१ दशलक्ष टन दूध उत्पादित झाले आहे. भारतामध्ये गायींच्या ५३ व म्हशींच्या २० जाती आढळून येतात. तथापि, उर्वरित सुमारे ७० टक्के गायी गावठी आहेत. सर्वच जातींची सरासरी दूध उत्पादन क्षमता कमी आहे. परंतु काही गायी आणि म्हशी उच्च दूध उत्पादन देणाऱ्या असून त्या जातीवंत आहेत. भविष्यात जास्त दूध देणाऱ्या जातीवंत गायी आणि म्हशी तयार करण्यासाठी सध्याच्या उच्च वंशावळीच्या गायी-म्हशींचे जतन करणे आवश्यक आहे. केंद्र शासन आणि राज्य शासन याकरिता प्रयत्नशील आहेत. सध्या देशात १७२ पशुपैदास केंद्र कार्यरत आहेत. त्यापैकी मागील पाच वर्षांत सात ठिकाणी मध्यवर्ती पशुपैदास केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. परंतु या सर्व प्रक्षेत्रामध्ये पशुधन संख्या कमी प्रमाणात आहे. म्हणून देशातील उच्च वंशावळीच्या विविध जातींच्या गायी आणि म्हशींची नोंद करून, त्यांची पैदास करून, त्यांचे वितरण इतर पशुपालकांना करणे, त्यांचे जतन करणे आणि दूध उत्पादनाच्या नोंदी अद्ययावत ठेवण्याची संगणकीकृतप्रणाली विकसित करणे आवश्यक आहे.

यामुळे सुरभी चयन श्रृंखला ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेत गोशाळा, पांजरपोळ आणि पशुपालकांकडील उच्च वंशावळींच्या जातीवंत जास्त दूध देणाऱ्या जनावरांचा शोध घेणे, अशा सर्व जनावरांची यादी त्यांच्या दूध उत्पादनासह प्रसिद्ध करणे, जातिवंत जनावरे पाळणाऱ्या पशुपालकांना आणि गोशाळांना प्रोत्साहन देणे, तसेच सदर जनावरांचे प्रमाणीकरण करणे समाविष्ट आहे. पशुपालकामध्ये जनजागृती करून त्यांना उच्च वंशावळीची जनावरे पाळण्यास आणि पैदास करण्यास उद्युक्त करणे आवश्यक आहे.

सरकारच्या सुचनेनुसार पशूसंवर्धन विभागाकडून प्रत्येक गावात उच्च प्रतीच्या गावंश आणि २० लीटरपेक्षा अधिक दूध देणार्या गायींची माहिती भारत सरकारच्या पशुधन प्रणालीवर नोंदवण्यात येत आहे. जिल्ह्यात आतापर्यंत १,३०० हून अधिक गायींची माहिती नोंदवण्यात आली आहे. पुढील आठवड्यात जिल्ह्यातून पाच हजारांहून अधिक गायींची माहिती या प्रणालीवर अद्ययावत करण्यात येणार आहे.

दशरथ दिघे, जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद

निवृत्तीनाथ महाराजांच्या...

देवळाली, राहुरी, अहिल्यानगर, कर्जत ते पंढरपूर असे ४५० किलोमीटरचे अंतर पायी चालत वारकरी नाथांच्या पालखीत सहभागी होतात.पालखीचे आगमन होताच या भागातील हरिभक्त वारकऱ्यांचे जल्लोषात स्वागत करतात. त्यांना भोजन, नाष्टा चहापानी, सरबत, फराळाचे पदार्थ, फळे वाटप करून त्यांचा नागरिक आशिर्वाद घेतात. संत निवृत्तीनाथ संस्थानच्या वतीने पालखी सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. परंपरेप्रमाणे त्र्यंबकेश्वर येथून विधिवत पूजा करून संतश्रेष्ठ निवृत्तीनाथांच्या पादुका चांदीच्या रथात विराजमान करण्यात येणार आहे. प्रस्थानाच्या मिरवणुकीनंतर टाळ मृदंगाच्या गजरात श्रींचे रथातून पंढरपूरकडे प्रस्थान होईल. हा पालखी सोहळा राज्यात अत्यंत वैभवशाली आणि परंपरेप्रमाणे होणारा आहे. वारकऱ्यांना या पालखी सोहळ्यात हव्या असणाऱ्या मूलभूत सुविधा देण्यात आल्या आहेत. मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा पालखी सोहळ्यात काही नवीन दिंड्या सहभागी होणार आहेत. वारी मार्गात त्या निवृत्तीनाथांच्या सोहळ्यात सहभागी होतील.

पंढरपूरपर्यंत यंदा तीन बैलजोड्या रथासाठी असून साधारणतः ३० हजार वारकरी पालखी सोहळ्याबरोबर चालणार आहेत. अहिल्यानगरीतून यात वाढ होणार असून पंढरपूरपर्यंत एक लाख वारकरी निवृत्तीनाथांच्या रथाबरोबर चालतील, अशी माहीती देवस्थानच्या वतीने देण्यात आली.

पालखी सोहळ्याचा पहिला मुक्काम त्र्यंबकेश्वरजवळील पेगलवाडी येथील महानिर्वाणी आखाड्यात होणार आहे. वारकऱ्यांची वेगवेगळ्या ठिकाणी होणाऱ्या मुक्कामात कुठलीही गैरसोय होऊ नये, यासाठी देवस्थानच्या वतीने पाणी, फिरते शौचालय आदी व्यवस्था करण्यात आली आहे.

असा आहे पालखीचा मार्ग...

- अहिल्यानगरमध्ये रात्रीचा मुक्काम. २३ जून रोजी अहिल्यानगर प्रस्थान त्यानंतर साकत, घोगरगाव, मिरजगाव, कर्जत, कोरेगव, रावगाव, जेऊर, कंदर, दगडी अकोले, करकंब, चिंचोली या ठिकाणी होणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात २३ जून ते पाच जुलै या कालावधीत अहिल्यानगर, साकत, कर्जत, कोरेगांव, रावगांव, जेऊर आदी भागात मुक्काम राहील. यानंतर दिंडी पंढरपूरच्या वेशीवर मुक्काम करून पंढरपुरात दाखल होईल.

वादळी वाऱ्याच्या तडाख्याने...

झाडे रस्त्यावर उन्मळून पडली होती. अनेक ठिकाणच्या विद्युत वाहक तारा तुटल्याने बऱ्याच ठिकाणी विद्युत पुरवठा खंडीत होता. त्यामुळे अनेक नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ आली. ग्रामीण भागात जनावरे देखील पाण्यासाठी तडफड करत होती. अनेकांना आहे त्या पाण्यात भागवावे लागले. अचानक झालेल्या पावसामुळे शहरातील नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. काही ठिकाणी वृक्षांसह फांद्या विद्युत वाहक तारावर तुटून पडल्याने वीजपुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे शनिवारी दुपारी चार वाजेपासून वीजपुरवठा खंडित होता. तो रविवारी दिवसभर कायम होता. ग्रामीण भागातील खंडाळा, बेलापूर-ऐनतपूर याठिकाणी रात्री उशिराने विद्युत पुरवठा सुरळीत झाला. महावितरणच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नानंतर श्रीरामपूर शहरात काल रविवारी दुपारी ११ वाजता वीज पुरवठा सुरू करण्यात आला. पण अनेक ठिकाणी व्होल्टेज कमी होते. दुपारी ३ वाजेच्या सुमारास वीज अनेक ठिकाणी सुरळीत झाली. तेव्हा नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. शिरसगाव, सूतगिरणी पासून या भागात २८ तासानंतर रात्री ७.३० वाजता पुरवठा सुरळीत झाला. काही भागात रात्री ८ वाजता वीज पुरवठा सुरूळीत करण्यात आला.

शनिवारी झालेल्या वादळी पावसामुळे जनजीवन काही प्रमाणात विस्कळीत झाले. शहरात वॉर्ड नं १ व २ मध्ये काही ठिकाणी झाडाच्या फांद्या पडल्याने वीजतारा तुटल्यामुळे वीजपुरवठा खंडित झाला होता. वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी वीज कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न सुरू होते. पावसाळ्यापूर्वी वृक्षाच्या फांद्या छाटल्या गेल्या नाहीत. त्यामुळे या फांद्यांचा अडसर वीज तारांना झाला. काल दिवसभर शहरातील बाजारपेठेतील वीज पुरवठाही बंद होता. त्यामुळे बाजारपेठेतील व्यवहारही मंदावले होते. आईस्क्रीम दुकानांनाही याचा फटका बसला. पावसाचे कारण सांगून वीजेचा पुरवठा बंद ठेवण्यात आला. त्यामुळे अत्यावश्यक ठरणाऱ्या कामांवर परिणाम झाला. वीज खंडीत झाल्याने दवाखाने, हॉटेल, दुकान मालकांना मोठी कसरत करावी लागली. जनरेटर भाड्याने आणून गरज भागवावी लागली. काही ठिकाणी विवाह सोहळ्या निमित्त सत्यनारायण पूजा आणि जागरण गोंधळाचा कार्यक्रम होता. त्यांनाही अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. अन्य कार्यालये, जनरेटरवर काही कामे करावी लागली. नागरिकांना याचा त्रास झाला. सुमारे चोवीस ते तीस तास वीज पुरवठा खंडित होता. ग्रामीण भागात जास्त काळ वीजपुरवठा खंडित असल्याच्या तक्रारी येत होत्या.

दाखले आणि शपथपत्रासाठी...

चुकीची असल्याचे ते म्हणाले.

...तर माफी नाही !

हा निर्णय सामान्य माणसाच्या हिताचा आहे. २००४ पासून ही सवलत लागू आहे. सरकारच्या वतीने याबाबत सांगण्यात येते. तरीही जिल्हा व तालुका प्रशासन याकडे दुर्लक्ष करणार असेल तर कारवाई केली जाईल. सर्वसामान्य जनतेला अकारण वेठीस धरणाऱ्यांना माफी नाही.

–चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री

कांदा निर्यातीत ३२% घट...

जागतिक बाजारपेठेत आपला दर्जा कायम राखता येईल. तसेच, स्पर्धात्मक शुल्क आणि निर्यात नियमांचे सुलभीकरण करणे आवश्यक आहे. स्पर्धक देशांनी भारताने व्यापलेली रिकामी जागा भरण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे भारताच्या कृषी निर्यातीत पुन्हा बळकटी येण्यासाठी दीर्घकालीन धोरण आवश्यक आहे, असे कांदा निर्यातदार विकास सिंग यांनी सांगितले.

कांदा निर्यात रोडावल्याचे कारण

डिसेंबर २०२३ ते मे २०२४ या कालावधीत केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती. मे २०२४ मध्ये बंदी उठवून ५५० प्रति टन किमान निर्यात मूल्य (चएझ) आणि ४०% निर्यात शुल्क लागू करण्यात आले. सप्टेंबर २०२४ मध्ये निर्यात शुल्क २०% करण्यात आले, जे एप्रिल १, २०२५ पासून पूर्णपणे रद्द करण्यात आले.

स्पष्ट धोरण हवे

केंद्र सरकारच्या निर्यात धोरणातील सतत बदलामुळे शेतकऱ्यांमध्ये अनिश्चितता निर्माण झाली आहे. सरकारने दीर्घकालीन आणि स्पष्ट धोरण राबवणे आवश्यक आहे, असे मत शेतकरी व्यक्त करीत आहेत.

विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार...

चंद्रकांत पाटील पुढे म्हणाले की, आंत्रप्रिनरशीप अंतर्भूत पदवी/पदविका कार्यक्रम अंतर्गत विद्यापीठांनी संबंधित क्षेत्रातील उद्योग व कंपन्यांसोबत भागीदारीत व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करावेत. यामुळे बी.ए., बी.कॉम., बी.एससी. अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण व करिअर संधी उपलब्ध होतील. नामांकित आंतरराष्ट्रीय विद्यापीठे महाराष्ट्रात प्रवेश करण्याच्या तयारीत आहेत. त्यांच्या स्पर्धेला तोंड देण्यासाठी राज्यातील विद्यापीठांनी दर्जा वाढवण्याची तयारी ठेवावी.

प्राध्यापकांच्या व्यक्तिमत्वात भरण्यासाठी विद्यापीठांना परवानगी दिली आहे. सेवेचा अधिकार कायदा अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी आवश्यक २० सेवा १५ जुलै २०२५ पर्यंत सुरू कराव्यात. या अंमलबजावणीसाठी विविध विभागांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील काल मर्यादेत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. अशी सूचना पाटील यांनी दिल्या.

दीड वर्षापासून सहा पंचायत...

या पदाचा कारभार ए बीडीओ यांच्यामार्फत सुरू असला तरी अतिरिक्त कारभारामुळे संबंधित ठिकाणच्या ए बीडीओ यांची डोकेदुखी वाढली आहे. तीन वर्षाहून अधिक काळ प्रशासक राज असून राज्य सरकार व केंद्र सरकारच्या सर्व योजना प्रशासक यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनापोटी दर महिन्याला कोट्यवधी रुपयांचा निधी प्राप्त होत असून तो खर्च करून संबंधित निधीचे नियोजन करण्याचे काम तालुका पातळीवर गटविकास अधिकारी यांच्यावर आहे. मात्र, जिल्ह्यातील १४ पैकी सहा ठिकाणी प्रभारी राज असल्याने जिल्हा परिषद प्रशासनाची देखील डोकेदुखी वाढलेली आहे. पंचायत समितीमार्फत घरकुल योजना ते ग्रामीण भागातील रस्त्याची कामे, शालेय शिक्षण, आरोग्य, महिला बालकल्याण यासह जलसंधारणाचे कामे देखील करण्यात येतात. या सर्व कामांची देखरेख करण्याची तसेच मंजूर झालेला निधी खर्च करण्याची जबाबदारी गटविकास अधिकारी यांच्यावर आहे. मात्र, असे असतांना संगमनेरचे गटविकास अधिकारी पद सहा महिन्यांपासून, राहाता आणि कोपरगावचे पद सात महिन्यांपासून तर पारनेर आणि कर्जतचे पद दीड वर्षापासून रिक्त आहे. रिक्त असणाऱ्या या पदावर मे महिन्यांच्या अखेरीस नियुक्ती होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, अजूनही या पदावर नियमित गटविकास अधिकाऱ्यांची नियुक्ती झाली नाही. त्यामुळे प्रभारी अधिकारी आता वैतागले आहे. त्यांना त्यांच्या मूळ पदाचे काम करून गटविकास अधिकारी पदाचे कामकाज करावे लागत आहे. ग्रामविकास विभागाने तातडीने या रिक्त पदावर नियुक्ती करावी अशी मागणी होत आहे.

आता दर आठवड्याला...

समोर याचिकेदरम्यान सादर केले जातील असे खाजगी बसचालक-मालक संघटनेने म्हटले आहे.

राज्य सरकारची आचारसंहिता नेमकी काय?

शालेय शिक्षण विभागाने जारी केलेल्या सूचनांनुसार, बस चालक, महिला सहाय्यक आणि कामगारांची दिवसातून दोनदा सकाळी आणि संध्याकाळी तपासणी केली जाणार आहे. कोणत्याही अनधिकृत व्यक्तीला स्कूलबसमध्ये प्रवेश दिला जाणार नाही. खाजगी स्कूल व्हॅन आणि बसेसमधून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना त्याचा चालकाची ओळख आणि पार्श्वभूमी शाळा व्यवस्थापनाला द्यावी लागणार आहे. पालकांनाही या चालकाची वैयक्तिक माहिती स्वत:जवळ बाळगावी लागणार आहे. तसेच अशा बस चालकांची चौकशी करणे शाळा व्यवस्थापनाला बंधनकारक असेल.

शाळेच्या मुख्याध्यापकांवरही जबाबदारी

या निर्णयामुळे शाळा व्यवस्थापनावर स्कूल बसेस आणि विद्यार्थ्यांच्या इतर सुरक्षेची जबाबदारी स्पष्ट करावी असे म्हटले आहे. आता शाळेचे मुख्याध्यापक विद्यार्थ्यांच्या बस प्रवासातील सुरक्षेची थेट जबाबदारी घेतील. सध्या मुंबईत सुमारे ६,००० स्कूल बसेस मुलांची वाहतूक करीत असतात. अशा परिस्थितीत मुलांच्या सुरक्षेसाठी हे मोठे पाऊल म्हटले जात आहे.